# प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांना करिअर कट्टाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार जाहीर

देगलूर (प्रतिनिधी) :-

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धा परीक्षे संदर्भात मार्गदर्शक असलेल्या 'करिअर कट्टा' या उपक्रमाची राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा २०२३-२४ अंतर्गत दिले जाणारे पुरस्कार जाहीर झाले असून करिअर कट्टा उपक्रमाची देगलूर महाविद्यालयात उत्कृष्ट अंमलबजावणी करणाऱ्या प्राचार्यांसाठी दिला जाणारा 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांना जाहीर झाला आहे.

करिअर कट्टा हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असून या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आय ए एस आपल्या दारी व उद्योजक आपल्या दारी या दोन योजना राबविल्या जात असून सदरील योजना प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालयात अतिशय उत्तमपणे राबविल्या आहेत.



त्यासाठी स्वतंत्र स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व करिअर कट्टा कक्षाची ग्रंथालयात स्थापना, करिअर कट्टा फलक अनावरण, करिअर कट्टा कार्यशाळा, विद्यार्थी करिअर संसद, स्पर्धा परीक्षा व करिअर कट्टाचे टेलिग्राम चॅनल, एम्प्लॉयमेंट न्यूज बोर्ड, स्पर्धा परीक्षा विशेष व्याख्याने, दररोज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे अभ्यासवर्ग, खुली सामान्य ज्ञान परीक्षा, रोजगार मेळाव्याचे आयोजन, यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा इ. उपक्रम राबविले आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्र अप्पा द्याडे, देवेंद्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक डॉ संजय देबडे व डॉ सुरेश काशिदे, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner